# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१ फॅक्स : २६९२१०२
तार : EDUTECHE e_mail : desk4@dte.org.in
Web : www.dte.org.in


क्रमांकः१७/ DTE /सामंजस्य करारा/२०११/ ५
दिनांक : २५/२/२०११

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषयः शैक्षणिक सुधारणा होण्यासाठी संस्थांनी औद्योगिक व इतर आस्थापनांसोबत सामंजस्य करार करणेबाबत..

संदर्भः शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०११/(१६/११)/तांशि-२, दि. २८/१/२०११.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन शासन पत्रासोबत प्राप्त झालेले दि. २५/१/२०११ चे परिपत्रक सहपत्रासह सोबत जोडत आहे.

या परिपत्रकास अनुसरुन असे कळविण्यात येते की. सदरचे परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये/तंत्रनिकेतन/औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका/एम.बी.ए./एम.सी.ए/हॉटेल मॅनेजमेंट/आर्किटेक्चर पदवी व पदविका संस्थांना पाठविण्यात यावे. व ज्या संस्थांनी दि. ३१/१२/२०१० पर्यंत परदेशातील विद्यापीठ/ परदेशातील संस्था/ देशातील औद्योगिक आस्थापना/देशातील शासकीय संस्था व संशोधन केंद्र/ संस्थेचे भूतपूर्व विद्यार्थी व त्यांच्या आस्थापना/देशातील संस्था यांच्याबरोबर सामंजस्य करार केले असतील तर त्याची माहिती परिपत्रकासोबत जोडलेल्या एक्सेल फॉर्मेटमध्ये असलेल्या प्रपत्रामध्ये आपल्या स्तरावर संकलित करुन दि. १८/२/२०११ पर्यंत या संचालनालयास (qacell.dte@gmail.com)ई-मेल द्वारे पाठविण्यात यावी.

सदर माहिती पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी संस्थानिहाय व अभ्यासक्रमनिहाय संकलित करुन पाठविण्यात यावी. संस्थांनी विभागिय कार्यालया मार्फतच माहिती पाठवावी. वरील ईमेलचा थेट वापर करु नये.

(डॉ. सु. का. महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

*************************************************************************

जा.क्र. तंशि/विकाना/तांशा/२०११/ २८१
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक
दिनांक 28 फरवरी FEB 2011

प्रति,
संचालक / प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित,
अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र /एचएमसीटी अभ्यासक्रम,
पदविका व पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
नाशिक विभाग

२/- त्यांना कळविण्यात येते की, संचालनालयाचे सदर पत्रातील सूचनेप्रमाणे नोंद घेउन त्याप्रमाणे आपल्या संस्थेची माहिती विहीत प्रपत्रात **तात्काळ दिनांक २८ फेब्रुवारी २०११ पर्यंत या कार्यालयाच्या ronashik.tasha@gmail.com** या ईमेल वर व दोन प्रतित प्रिंट सादर करावी, जेणेकरुन माहिती संचालनालयास वेळेत सादर करता येईल. तसेच सदर फाईल Excel मध्ये करुन Institute Code नें save करुन स्वाक्षरीसह पाठविण्यात यावी. (उदा. EN3014 Amrutwahini ) तसेच सदरील माहिती परस्पर संचालनालयास सादर करु नये.

(दि.रा.नंदनवार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

प्रत - प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक
२/- सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.